


RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## अमेरिकन कोर्टात भारताचा मोठा विजय मुंबई हल्ल्याचा मास्टरमाइंड तहव्वूर राणाला कोर्टाचा दणका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

अमेरिकन कोर्टात भारताचा मोठा विजय झाला असून, २६/११ मुंबई हल्ल्याचा मास्टरमाइंड तहव्वूर राणाला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई हल्ल्याचा मास्टर माईंड तहव्वूर राणाला भारताच्या ताब्यात न देण्याची याचिका अमेरिकेच्या न्यायालयाने फेटाळून लावली. त्यामुळे तहव्वूर राणाला भारतात आणण्याच्या हालचालींना वेग आल आहे. राणाविरोधात भारताने पुरेसे पुरावे सादर केले आहेत, असे न्यायालयाने म्हटले आहे.



२६/११च्या हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी राणाच्या नावाचा समावेश चार्जशीटमध्ये करण्यात आला आहे. तसेच त्याच्यावर पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजन्स आणि दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाचा सक्रिय सदस्य असल्याचा आणि मुंबईतील ठिकाणांची रेकी केल्याचा आरोप आहे.

तहव्वूर राणा आणि त्याचा सहकारी डेव्हिड कोलमन हेडली यांनी मिळून मुंबई हल्ला यशस्वी करण्यासाठी ब्लू प्रिंट तयार केली होती. राणा सध्या लॉस एंजेलिस तुरुंगात आहे. अमेरिकेत राणाला त्याच्यावरील आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात आले आहे, परंतु भारताच्या प्रत्यार्पणाच्या याचिकेमुळे त्याची तुरुंगातून सुटका झालेली नाही. एनआयएने दिल्ली न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. ज्यात हेडली, राणा, हाफिज सईद, झकी-उर-रहमान लखवी, इलियास काश्मिरी, साजिद मीर, अब्दुर रहमान हाशिम सय्यद, मेजर इक्बाल आणि मेजर समीर अली यांची नावे आहेत. एनआयएच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी लष्कर-ए-तैयबा आणि हुजीच्यावतीने महत्त्वाच्या ठिकाणांची रेकी करून योजना आखली. यात मुंबईत झालेल्या २६/११ च्या ठिकाणांचाही समावेश आहे.

## करोडो शेतकऱ्यांना केंद्राकडून नवीन वर्षाचे मोठे गिफ्ट; पहिल्याच कॅबिनेटमध्ये महत्वाचे निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

एकीकडे शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी दिल्ली बॉर्डरवर आंदोलन सुरु केलेले असताना दुसरीकडे केंद्राने नव्या वर्षाच्या सुरुवातीला मोठे गिफ्ट जाहीर केले आहे. केंद्र सरकारच्या कॅबिनेटमध्ये अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये खताच्या पिशवीवर अतिरिक्त सबसिडी जाहीर करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पंतप्रधान पीक विमा योजना आणि हवामान आधारीत



पीक विमा योजनेला २०२५-२६ पर्यंत सुरु ठेवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी ६९५१५ कोटी रुपये देण्यात आले आहेत.

तसेच ५० किलोच्या डीएपीच्या बॅगेवर अतिरिक्त सबसिडी देण्यात आली आहे. ही खताची बॅग यापुढेही शेतकऱ्यांना १३५० रुपयांना मिळत राहणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढलेल्या किंमतीपासून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून यासाठी ३८५० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली आहे. पंतप्रधानांनी ही कॅबिनेट बैठक शेतकऱ्यांसाठी घेतली आहे. या बैठकीत शेतकऱ्यांसाठी व्यापक चर्चा झाली आहे. यामुळे हे निर्णय त्यांच्या भल्यासाठी घेण्यात आल्याचे वैष्णव म्हणाले. पीक विमा योजनेत वेगाने पंचनामे, विमा परतावा आदी बाबींसाठी ८०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. तसेच याची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि अर्ज प्रक्रिया सोपी करण्यासाठी मोदी यांनी ही प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल करण्याचा निर्णय घेतला आहे.

## चहापाणी सोडलं, जेवणही नाकारलं, कशी होती कराडची तुरुंगातील पहिली रात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१बीड**

राज्यभर गाजत असलेल्या बीडच्या खंडणी आणि मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुखच्या हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मिक कराड याने मंगळवारी सीआयडीसमोर शरणागती पत्करली. त्यानंतर केजमधील कोर्टाने कराडला १५ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली. थाटात जगत असलेल्या वाल्मिक कराडची तुरुंगातील पहिली रात्र फारशी चांगली राहिली नसल्याचे समोर आले आहे.

पुण्यात सीआयडी मुख्यालयात शरण आलेल्या वाल्मिक कराडची चौकशी



करून त्याला केज कोर्टात हजर करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत त्याची सुनावणी सुरू होती. केज कोर्टाने वाल्मिक कराडला १५ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली. त्यानंतर पोलिसांनी त्याची रवानगी तुरुंगात केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वाल्मिक कराड याने रात्रीपासून जेवण घेतले नाही. सकाळी नाश्ताही केला नाही. वाल्मिक कराडला मधुमेह आणि रक्तदाबाचा त्रास आहे. रात्री कराड हा ऑक्सिजन लावून झोपला होता, अशी माहितीदेखील सूत्रांनी दिली.

रात्री उशिरा तुरुंगात गेल्याने वाल्मिक कराड हा सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास उठला. सकाळी आवरल्यानंतर त्याने चहा, नाश्तादेखील घेतला नाही. वाल्मिक कराडला मधुमेहचा त्रास आहे. त्यामुळे कराडला आग्रह केल्यानंतर त्याने सकाळी ११.३० वाजता सरकारी जेवण घेतले. त्यावेळी त्याने अर्धी चपाती खाल्ली. सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास भात किंवा खिचडी देण्याची मागणी त्याने केली असल्याचे समजते.

**अन्य तीन आरोपींचा शोध सुरू**

संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणातील तीन आरोपी फरार आहेत. या तिन्ही आरोपींचा शोध सुरू आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे हे तीन आरोपी फरार आहेत. वाल्मिक कराडसाठी हे काम करत असल्याचे म्हटले जात आहे. आता वाल्मिक कराड हा सीआयडीसमोर शरण आला. त्यानंतर आता या मुख्य आरोपींचा शोध सुरू झाला आहे.

**सीआयडीला अटक करण्यात यश मिळणार का?**

आरोपी वाल्मिक कराड याने मंगळवारी सीआयडीसमोर शरणागती पत्करली. संतोष देशमुखच्या हत्या प्रकरणाच्या जवळपास २२ दिवसानंतर वाल्मिक कराडने सीआयडीसमोर सरेंडर केले. वाल्मिक कराडला अटक करता न येणे हे सीआयडीचे अपयश असल्याची टीका करण्यात येत आहे. त्यामुळे आता सीआयडीसमोर फरार असलेल्या तिन्ही आरोपींना अटक करण्याचे मोठं आव्हान आहे.

## नव्या वर्षात देवदर्शनाला निघालेल्या भाविकांवर काळाचा घाला, ४ जणांचा जागीच मृत्यू, ८ गंभीर जखमी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१सोलापूर**

नव्या वर्षाचं राज्यभर उत्साहात स्वागत करण्यात आले. सरत्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाचं स्वागत करण्यासाठी अनेकजणांनी मंदिरात जाणं पसंत केले. नव्या वर्षात देवदर्शनाला जाताना काळाने घाला घातलाय. सोलापूरमध्ये झालेल्या भीषण अपघातामध्ये चार जणांचा जागीच मृत्यू झालाय. तर सात ते आठ जण गंभीर जखमी झाल्याचे समजतेय. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलेय.

नवीन वर्षी देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर काळाने घाला घातलाय. स्कॉर्पिओ आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. यामध्ये चार जणांचा जागीच मृत्यू झालाय. त्यामध्ये दोन महिला आणि दोन पुरूषांचा समावेश आहे. जखमींना सोलापूरमधील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेय. गणगापूरला जात असताना मैंदर्गीजवळ अपघात झाल्याचे समजतेय. मृत हे नांदेड जिल्ह्यातील असल्याचे प्राथमिक माहितीमधून समोर आलेय.

अक्कलकोट श्री स्वामी समर्थ दर्शन घेऊन गणगापूरला जातं असताना मैंदर्गी जवळ स्कॉर्पिओ आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. समोरासमोर झालेल्या अपघातात २ महिला आणि २ पुरुष यांचा जागीच मृत्यू झाला. तर ७ ते ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सर्व भाविक नांदेड जिल्ह्यातील आहेत. अपघातस्थळी अक्कलकोट पोलीस दाखल झाले असून जखमींना तातडीने अक्कलकोट सार्वजनिक रुग्णालयात करण्यात दाखल आले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## महाराष्ट्र आता थांबणार नाही, सुख समृद्धीची पावले उमटावीत; मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री कडून नववर्षाच्या शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

नवीन वर्ष सुरू झाले आहे. केवळ भारतात नाही, तर संपूर्ण जगभरात नववर्षाचे उत्साहात स्वागत केले जात आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून राजकीय वर्तुळातील तसेच देशभरातील अन्य क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी देशवासीयांना नववर्ष २०२५ च्या शुभेच्छा दिल्या आहेत. यातच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही जनतेला नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणतात की, राज्यातील कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि प्रत्येक नागरिकाच्या योगदानाने महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखरावर नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. शांतता-सलोखा वाढवत, पर्यावरण जपत आणि विकासासोबत आधुनिकीकरणाच्या दिशेने महाराष्ट्राला अग्रगण्य बनवण्याचे उद्दिष्ट ठेऊन सकारात्मक ऊर्जेने भरलेल्या या संकल्पांची नववर्षात पूर्तता होईल, अशी मनोकामना देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. तसेच २०२५ मध्ये पाऊल ठेवताना एकता आणि दृढनिश्चयाने नवीन संधींचे स्वागत करूया. हे वर्ष सर्वांना उत्तम आरोग्य, आनंद आणि भरभराटीचे जावो. २०२५ या नव्या वर्षाच्या सर्वांना मनःपूर्वक आणि आरोग्यदायी शुभेच्छा, असे सांगत राज्यातील जनतेला नववर्षाच्या शुभेच्छा देताना 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' असा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

## ठाकरेंना कोकणात धक्का? माजी आमदार जय महाराष्ट्र करण्याच्या तयारीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१रत्नागिरी**

नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच उद्धव ठाकरेंना धक्का देणारी बातमी आली आहे. राज्यात नवीन वर्षाचं सेलीब्रेशन सुरू असताना फटाके मात्र राजकारणात फुटत आहेत. राजापूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि ठाकरे गटाचे प्रमुख नेते राजन साळवी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. राजन साळवी मागील काही दिवसांपासून नाराज आहेत. त्यामुळे आता ते उद्धव ठाकरेंची साथ सोडण्याचा निर्णय घेऊ शकतात असे सांगितले जात आहे.



निवडणूक काळात आणि त्यानंतर वरिष्ठांनी आपली काहीच दखल घेतली नाही अशी भावना साळवी यांच्या मनात निर्माण झाली आहे. मागील काही दिवसांपूर्वी त्यांची चौकशी झाली होती. आता पुन्हा एसीबीच्या चौकशीचा ससेमिरा मागे लागण्याची चिंता त्यांना सतावत आहेत. त्यामुळे राजन साळवी लवकरच पक्ष सोडतील अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

यानंतर आता राजन साळवी भाजपमध्ये जाणार की शिंदे गटात प्रवेश करणार याबाबत अद्याप काहीही स्पष्ट नाही. मात्र जर राजन साळवी यांनी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करण्याचा निर्णय घेतलाच तर उद्धव ठाकरेंच्या अडचणी वाढणार आहेत. कोकणात शिवसेनेला मोठं खिंडार पडण्याचाही धोका आहे. त्यामुळे आता राजन साळवी काय निर्णय घेतात, खरंच ठाकरे गटाची साथ सोडणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.भाजप प्रवेशाच्या चर्चांवर राजन साळवी यांनी कालच प्रतिक्रिया दिली होती. मी बाळासाहेबांचा लाडका शिवसैनिक आहे. त्यांना अभिप्रेत असलेली कामं मी आजपर्यंत केली आहेत. त्यांच्याच विचारांचे काम मी पुढे नेणार आहे.

## माझं मंथन सुरू आहे आता लवकरच.., नववर्षानिमित्त राज ठाकरेंच्या सूचक शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

जगभरात नव्या वर्षाचं मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात स्वागत करण्यात आलं. या स्वागताचा जल्लोष ३१ डिसेंबरच्या दिवसापासूनच सुरू झाला होता. नववर्षानिमित्त देशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तर दुसरीकडे राजकीय नेतेमंडळींकडून नवीन वर्षाच्या शुभेच्छांचा सिलसिला सुरू झाला आहे. यातच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केलेली सूचक पोस्ट राजकीय



वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

**राज ठाकरेंच्या पोस्टमध्ये काय**

सर्व प्रथम सर्वांना इंग्रजी नवीन वर्षाच्या शुभेच्छा ! कालगणनेत या वर्षाला एक महत्व आहे. कारण या शतकातील, पाव शतक संपायला आलं. माणसाच्या आयुष्यातल्या जवळपास प्रत्येक क्षेत्रांत इतके प्रचंड बदल झालेत की २५ वर्षांपूर्वीचं आयुष्य हे वेगळं युग वाटावं. या २५ वर्षांच्या कालखंडात आपला पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना ज्याची स्थापना झाली, तो स्थिरावला, पक्षाने अनेक चढउतार पाहिले. आणि हे सगळं आपल्या सगळ्यांना खूप काही शिकवून गेलं.

**मतदानाच्या वेळेस मनसेचा विसर**

या २५ वर्षांत जरी खूप बदल झाला असला तरी अनेक गोष्टी तशाच राहिल्यात, मुंबईसारख्या महानगरात जी महाराष्ट्राची राजधानी आहे, तिथे मराठी माणसाला असुरक्षित वाटणं. तरुण मुलामुलींच्या हाताला काम न मिळणे पण त्याच वेळेस बाहेरच्या राज्यातून येणाऱ्यांना नोकरीच्या संधी मिळणं. बेरोजगाराला जात नसते, पण त्याला ती जात जाणवून देऊन, जातीजातीत भांडणं लावणं. शेतकऱ्यापासून ते सर्वच कष्टकऱ्यांच आयुष्य महागाईने होरपळून निघणं. या आणि इतर प्रत्येक समस्येच्या वेळेस लोकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची आठवण होणे, पण नेमकं मतदानाच्या वेळेस पक्षाचा विसर पडणे.

## संपादकीय ......

# शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न!

*पाचवी-आठवीच्या विद्यार्थ्यांना नापास करण्याबाबत शिक्षण हक्क कायद्यात दुरुस्ती करत केंद्र सरकारने सुरू असणार्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. यानुसार प्राथमिकस्तरावर पाचवी आणि आठवीत शिकणार्या विद्यार्थ्यांमध्ये संबंधित इयत्तेच्या किमान क्षमता प्राप्त नसतील, तर त्याच वर्गात विद्यार्थ्यांना पुन्हा बसावे लागणार आहे. यासाठी दोनदा परीक्षा घेतली जाईल. पुन्हा घेतलेल्या परीक्षेत विद्यार्थी नापास झाल्यास पाचवी किंवा आठवीच्या वर्गात पुन्हा प्रविष्ट होणार आहे.*

*केंद्र सरकारच्या वतीने पाचवी आणि आठवीच्या वर्गात विद्यार्थ्यांना नापास करण्यासंदर्भाने शिक्षण हक्क कायद्यात दुरुस्ती केली आहे. त्यासंदर्भाने राजपत्र प्रसिद्ध केले आणि शिक्षण क्षेत्रात पुन्हा एकदा उलटसुलट चर्चेला आरंभ झाला. देशात १ एप्रिल २०१० रोजी शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. याने निश्चित केलेल्या प्राथमिकस्तरावर म्हणजे पहिली ते आठवीच्या वर्गात विद्यार्थी नापास केला जाणार नाही, अशाप्रकारची भूमिका घेतली होती. यामुळे विद्यार्थ्यांचे शिकणे परिणामकारक होण्यासोबत देशातील गळतीचे प्रमाण कमी होईल, अशी अपेक्षा होती. नापास न करणे याचा अर्थ संबंधित इयत्तेत शिकत असताना, त्या इयत्तेच्या कोणत्याही क्षमता नसतानाही पुढच्या वर्गात विद्यार्थ्यांना ढकलणे, असा घेण्यात आला. खरे तर हे शिक्षण हक्क कायद्याला अपेक्षित नव्हते; पण कायद्यातील तरतुदीचा अर्थ चुकीच्या पद्धतीने लावण्यात आल्याने शिक्षण प्रक्रियेवर त्याचा विपरीत परिणाम झाला. समाजमनातही आता आठवीपर्यंत परीक्षा नाही, परीक्षेशिवाय विद्यार्थी सरसकट पुढच्या वर्गात जाणार, असा अर्थ काढला गेला. त्यामुळे कायद्यातील तरतुदींसंदर्भात समाजमनातून उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या.आकारिक मूल्यमापनासाठी विविध साधने आणि तंत्र निश्चित केले होते. मात्र, या साधन तंत्राद्वारे केले जाणारे मूल्यमापन म्हणजे काही परीक्षा नाही, असा अर्थ घेतला गेला. त्याचा परिणाम नकारात्मक झाला. त्या चुकीच्या चर्चेचा परिणाम म्हणून शिक्षण प्रक्रियेकडे पालक, विद्यार्थ्यांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. लोकांनी त्याचा अर्थ काढला की, कोणत्याही परीक्षेशिवाय विद्यार्थी पुढच्या वर्गात जाणार आहे. त्यामुळे अभ्यासाची गरज उरली नाही. तो अर्थ पालक आणि अगदी शिक्षणात कार्यरत असलेल्या मनुष्यबळाच्या मनातही अधिक दृढ झाला. दुसरीकडे, या निर्णयाचा विचार करताना त्याचा काही प्रमाणात सकारात्मक परिणामही देशात समोर आले. देशाची २००८ मध्ये असलेली प्राथमिकस्तरावरील शैक्षणिक गळती सुमारे २९ टक्के होती, तर उच्च प्राथमिकस्तरावरील गळती ही सुमारे ३९.३ टक्के इतकी होती. याचा अर्थ प्राथमिकस्तरावरील विद्यार्थ्यांचे गळतीचे सरासरी प्रमाण साधारणत: ३३.५५ टक्के इतके होते. मात्र, गेल्या १४ वर्षांत हे प्रमाण साधारणत: ४ टक्के इतके कमी करण्यात मोठ्या प्रमाणावर यश आले.*

# सोयाबीन खरेदी नोंदणीसाठी ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई,**

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी करण्यास ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केली.



**पणन मंत्री जयकुमार रावल**

पदभार स्वीकारल्यानंतर पणनमंत्री जयकुमार रावल यांनी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. विभागाचे कामकाज गतीने करण्यासाठी या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. बैठकीस पणन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, उपसचिव संतोष देशमुख आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पणन मंत्री श्री. रावल म्हणाले की, सोयाबीन उत्पादक शेतकरी, लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत सात दिवसांनी म्हणजेच ६ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वीच्या निर्णयानुसार ही मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. तसेच नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि एनसीसीएफ यांच्यामार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार आहे, अशी महिती देखील मंत्री श्री. रावल यांनी दिली.

पणनमंत्री श्री. रावल म्हणाले की, किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीनची खरेदी ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल या हमीभावाने सुरू आहे. आतापर्यंत सोयाबीनची तीन लाख ३४ हजार ३३१ मेट्रिक टन एवढी विक्रमी खरेदी झाली आहे. मागील वर्षी केवळ ७ हजार ४०० क्विंटल एवढी खरेदी झाली होती. यावर्षी शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपये मोबदला देण्यात आला आहे. राज्यात सध्या ५६१ खरेदी केंद्र सुरू असून आतापर्यंत ६ लाख ६९ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

शेतकऱ्यांना हमी भाव, तर ग्राहकांना रास्त दरात माल मिळाला पाहिजे यासाठी विभागाच्या माध्यमातून यापुढे प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती असली पाहिजे यासाठी प्रयत्न केला जाईल. त्याअंतर्गत आदिवासी भागातील तालुक्यांवर भर देण्यात येईल, या भागात शेतमालाची खरेदी-विक्री करण्यासाठी व्यापाऱ्यांना प्रोत्साहित केले जाईल, अशी माहिती मंत्री श्री. रावल यांनी दिली.

पणन विभागामार्फत शेतकरी हिताचे धोरण आखण्यात येणार आहे. सोयाबीन, धान, कापूस यासारख्या पिकांना हमीभाव मिळवून देण्यासह कांद्यासारख्या नाशवंत पिकांना रास्त भाव मिळण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. त्यासाठी जगातील उत्तम बाजार व्यवस्थेचा अभ्यास करून तेथील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आपल्या राज्यात वापर करण्यात येणार आहे. बाजार समित्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वर्गीकरण करण्यासह त्यांचे बळकटीकरण केले जाईल, अशी ग्वाही मंत्री श्री. रावल यांनी दिली.

नवी मुंबई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायापालट केला जाणार आहे. आशियातील अग्रेसर बाजार समिती म्हणून तिचा लौकिक होण्यासाठी जगातील उत्तमोत्तम व्यवस्था याठिकाणी राबविण्यात येणार आहे. शेतकरी, हमाल, मापारी, व्यापारी यासारख्या सर्व संबंधित घटकांचा विचार केला जाणार आहे, असा मानस देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

राज्यात शीतगृहांची उभारणी, गोदामांची निर्मिती, गाव तेथे गोदाम, माथाडी कामगार कायदा, शेतमालांची आयात-निर्यात, बाजार समित्यांना मिळणारा सेस, राज्यातील पीक पद्धती, दांगट समितीचा अहवाल, बाजार समिती सभापतींची परिषद यासारख्या बाबींचाही पणन मंत्री श्री. रावल यांनी यावेळी आढावा घेतला.

# घरबसल्या ट्रॅक्टरची सर्व्हिसिंग करून वाचवा हजारो रुपये

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

ट्रॅक्टर म्हटला की त्यात अनेकदा अडचणी येत असतात. त्यामुळे ट्रॅक्टर थेट सर्व्हिसिंगला घेऊन जाणे आवश्यक ठरते. अशावेळी जर घरबसल्या ट्रॅक्टरची सर्व्हिसिंग कशी करायची हे माहित असेल तर हजारो रुपयांची बचत होऊ शकते. जर घरच्या घरी ट्रॅक्टरची सर्व्हिसिंग करायची असल्यास कशाप्रकारे करायची? हे या लेखातून सविस्तर जाणून घेऊयात...



ट्रॅक्टरची सर्व्हिसिंग कधी करावी?

सर्वप्रथम, तुम्हाला ट्रॅक्टरची सर्व्हिसिंग कधी करावी लागते, याची नोंद ठेवावी लागेल. यासाठी ओडोमीटरची नोंद ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. जेव्हाही तुमचा ट्रॅक्टर २५० ते ३०० तास चालतो, तेव्हा समजा सर्व्हिसिंगची वेळ आली आहे. जर तुमचा ट्रॅक्टर शेवटच्या सर्व्हिसिंगपासून ३०० तास चालला असेल, तर लवकरात लवकर सर्व्हिसिंग करून घ्या, जर असे केले नाही तर हळूहळू ट्रॅक्टरची कार्यक्षमता कमी होऊ लागते.

**कोणत्या गोष्टींची आवश्यकता असेल?**

ट्रॅक्टरची सर्व्हिसिंग करण्यासाठी बाजारातून काही वस्तू खरेदी कराव्या लागतील. यातील पहिली गोष्ट म्हणजे त्याचे इंजिन ऑइल. ट्रॅक्टरचे मॉडेल आणि इंजिन क्षमतेनुसार इंजिन तेलाचे प्रमाण खरेदी करा. ग्रीस कॅन, ऑइल फिल्टर, एअर फिल्टर आणि डिझेल फिल्टर (बदलण्याची आवश्यकता असल्यासच खरेदी करा) आणि रेडिएटर कूलर. यासोबतच दुरुस्तीसाठी लागणारी साधने बाजारातून खरेदी करा.

**ट्रॅक्टरची सर्व्हिसिंग कशी करावी?**

ट्रॅक्टरला सर्व्हिस करण्यासाठी सर्वप्रथम जुने इंजिन ऑइल काढून टाकावे लागते. सर्व प्रथम, एक पाना घ्या आणि ट्रॅक्टर इंजिनच्या तळाशी चेंबर बोल्ट उघडा. या बोल्टखाली बादली किंवा पॅन ठेवा, जेणेकरून जळलेले इंजिन तेल पसरणार नाही आणि जमा होणार नाही.

यानंत डिझेल फिल्टर उघडा आणि ते काळजीपूर्वक काढून टाका आणि वेगळे करा. डिझेल फिल्टर पूर्णपणे स्वच्छ करा आणि आवश्यक असल्यास ते बदला. डिझेल फिल्टर प्रत्येक २५० ते ३०० तासांनी बदलण्याचा प्रयत्न करा.

आता ट्रॅक्टरचा एअर फिल्टर उघडा आणि स्वच्छ करा. जर एअर फिल्टर २५० ते ३०० तासांच्या अंतराने बदलावे लागले तर लक्षात ठेवा.

जर एअर फिल्टर खूप जुना झाला असेल तर तो नक्कीच बदला. एअर फिल्टर तसेच फिल्टर ड्रम साफ करण्यास विसरू नका. त्यामुळे ट्रॅक्टरचे मायलेजही चांगले राहील आणि परफॉर्मन्सही चांगला राहील.यासोबतच हायड्रॉलिक फिल्टर देखील २५० ते ३०० तास पूर्ण झाल्यानंतर बदलणे आवश्यक आहे. जर तुम्ही ट्रॅक्टरचे ब्रेक उघडू शकत असाल तर ते उघडा आणि साफ करा. ट्रॅक्टरचे ब्रेक साफ करण्यासाठी डिझेल वापरा. ट्रॅक्टरमध्ये इंजिन तेल भरण्यापूर्वी नवीन तेल फिल्टर करून घ्या.यानंतर, ट्रॅक्टरच्या इंजिनखाली चेंबर बोल्ट व्यवस्थित घट्ट करा आणि त्यात फनेल टाकून नवीन इंजिन तेल भरा. इंजिन तेल भरल्यानंतर, इंजिनचे झाकण घट्ट करा. यासह, रेडिएटरचे कुलर तपासा. कमी असेल तर भरा. त्याचा पंखा बेल्टही घट्ट करा.शेवटी, संपूर्ण ट्रॅक्टरला ग्रीस आणि महत्वाच्या ठिकाणी ऑइल सोडून घ्या. सर्वकाही पूर्ण झाल्यावर, ट्रॅक्टर सुरू करून पहा.




## हाडांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष नको, आतापासूनच करा आहारात बदल, या पदार्थांचा आहारात समावेश

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक –** अयोग्य आणि अपुरा आहार हे हाडं कमकुवत होण्याचं मुख्य कारण आहे. योग्य ती पोषक तत्व न मिळाल्यामुळे, हाडं कमकुवत होतात. त्यामुळे हाडांना आवश्यक खनिजं पुरवू शकतील अशा पदार्थांचा आहारात समावेश करण्याकडे लक्ष द्या.



हाडं मजबूत करण्यासाठी कोणत्या गोष्टींचा आहारात समावेश केला जाऊ शकतो. त्याची माहिती समजून घेऊया.

**सुका मेवा –** सुका मेवा ज्यात काजू, बदाम किंवा मनुका असे अनेक पर्याय आहेत, त्यातील कोरडं अंजीर हाडांच्या मजबुतीसाठी पूरक आहे. वाळलेल्या अंजीरात कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, लोह, तांबं आणि फॉस्फरसचं प्रमाण चांगलं असतं. याशिवाय अंजीरामध्ये व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन बी ६ आणि व्हिटॅमिन ए तसेच व्हिटॅमिन सी देखील असतं. हे सर्व घटक हाडं मजबूत करण्यासाठी प्रभावी आहेत.

**बदाम–**सुक्या मेव्यातील बदामही हाडांसाठी फायदेशीर आहे. बदामामध्ये कॅल्शियम असतं ज्यामुळे हाडं मजबूत होतात.

**दूध –**कमकुवत हाडं मजबूत करण्यासाठी, इतर काही पदार्थ आहाराचा भाग बनवता येईल. दुधात कॅल्शियम भरपूर असतं आणि त्यात व्हिटॅमिन डी देखील चांगलं असतं. दुध पिण्याचा हाडांना फायदा होतो.

**फरस्बी –**मजबूत हाडांसाठी बीन्स देखील आहाराचा भाग बनवता येतात. फरस्बीमध्ये जीवनसत्त्वं, लोह, मॅग्नेशियम आणि झिंक हे घटक चांगल्या प्रमाणात असतात.

**टोफू –** शाकाहारी लोक त्यांच्या आहारात टोफू खाऊ शकतात. टोफूपासून शरीराला भरपूर कॅल्शियम मिळतं.

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी विविध कामांचा नियोजित आराखडा सादर करावा

## – मुख्य सचिव सुजाता सौनिक

**दि.१ मुंबई,** नाशिक येथे सन २०२७-२८ या वर्षात होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आवश्यक वाहतूक व्यवस्था, नियोजित साधूग्राम, नागरिकांची सुरक्षा व घनकचरा व्यवस्थापन या संदर्भातील कामांच्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन नियोजित आराखडा सादर करावा, अशा सूचना मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिल्या.

सन २०२७-२८ या वर्षात नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा आयोजनासंदर्भात मंत्रालयात आयोजित उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी मार्गदर्शन केले. यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, परिवहनचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नगरविकास विभाग- १ चे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता, नगरविकास विभाग- २ चे प्रधान सचिव डॉ.के.एच.गोंविदराज, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, नाशिक विभागीय आयुक्त प्रविण गेडाम, पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील, नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महापालिका आयुक्त मनिषा खत्री, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांसह विविध विभागाचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तारखा लक्षात घेऊन पायाभूत सोयीसुविधांची कामे, साधूग्राममध्ये साधू-महंताची निवासव्यवस्था, वाहनतळ उभारणे, नागरिकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था, परिसर सुशोभीकरण, गोदावरी नदी आणि उपनद्या संवर्धन, शुद्धीकरण व सुशोभीकरण, ग्रीन झोन, गर्दीचे सनियंत्रण, आरोग्य तसेच सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर इतर अनुषंगिक कामे याबाबत स्थानिक प्रशासन स्तरावर बैठका घेऊन कामे अंतिम करून त्याचा आराखडा राज्यस्तरावर सादर करावा.सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कामांचे सूक्ष्म नियोजन करावे. सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन करण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावरील कामांचा आढावा घेण्यासाठी ठराविक कालावधीत बैठका आयोजित केल्या जाव्यात, सर्व यंत्रणांना सोबत घेऊन काम करावे, या कामांबाबत उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, जेणेकरून नियोजित कामांमध्ये आवश्यक तिथे सुधारणा करण्यासाठी मदत होईल, अशा सूचनाही मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिल्या.यावेळी नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठीच्या प्रस्तावित कामांचे सादरीकरण केले.

# प्रगतीशील महाराष्ट्र, गतीशील महाराष्ट्राच्या निर्धारासाठी एकजूट करुया – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## कष्टकरी, शेतकऱ्यांसह सर्वांना घेणार सोबत, नववर्षाच्या पूर्वसंध्येला दिल्या नागरिकांना शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई–** नवा महाराष्ट्र घडवायचा आहे. प्रगतीशील महाराष्ट्राला आणखी गतीशील बनवायचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी ..महाराष्ट्र आता थांबणार नाही...अशी प्रतिज्ञा करूया, एकजूट करुया असा निर्धार व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

हा निर्धार पूर्ण करण्यासाठी राज्यातील कष्टकरी, शेतकरी, कामगारासह सर्वांचीच साथ लाभेल, असा विश्वास देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी नववर्षाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या शुभेच्छा संदेशात नमूद केला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात, 'येणारे वर्ष सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो. महाराष्ट्राच्या प्रगतीची पताका अखंडीत फडकत ठेवण्याची ऊर्जा आणि उर्मी मिळत राहो, हीच मनोकामना. छत्रपती शिवाजी महाराज आणि अनेक थोर संतांच्या आशीर्वादाच्या छत्रछायेखालील महाराष्ट्राला आधुनिकीकरणाच्या या युगात जगातील सर्वोत्तम



राज्य म्हणून अग्रेसर ठेवायचे आहे. आपल्या कष्टकरी, शेतकरी, कामगारांच्या राबणाऱ्या आणि कला-क्रीडा-साहित्य-संस्कृती क्षेत्रातील सर्जक हातांनी या राज्याच्या वैभवात भरच घातली आहे. हा लौकिक आपल्याला वाढवायचा आहे. शेती-माती व सिंचन, शिक्षण, आरोग्य, उद्योग- ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान ते नवनव्या औद्योगिक क्रांती यांना पादाक्रांत करायचे आहे. यासाठी राज्यातील शांतता-सलोखा, परस्पर स्नेह, आदरभाव वृद्धिंगत होईल. पर्यावरण आणि जल-जंगल-जमीन यांचं जतन-संवर्धन होईल, असे प्रयत्न करायचे आहेत. हा संकल्प घेऊन वाटचाल करायची आहे, त्यासाठी नववर्ष चैतन्यदायी ठरेल. सकारात्मक ऊर्जेने भारलेल्या नवसंकल्पना घेऊन येईल. यातून आपला महाराष्ट्र आता थांबणार नाही, हा यत्न पूर्णत्वास जाईल. अशी मनोकामना करतो. तशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो, असे नमूद करून मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी शुभेच्छा देऊन सगळ्यांचे नववर्षाभिनंदन केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १ जानेवारी २०२५ | शहर/ग्रामिण


# शहर पोलीस आयुक्तांसह अमरावती शहर पोलिसांची रात्रभर गस्त

## मद्यपी वाहन चालकांविरोधात ड्रंक अँड ड्राइव्ह मोहिम










**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** थर्टी फस्टच्या आनंदोत्सवात कोणताही अनुचितप्रकारघडूनये म्हणजे शहरातील सर्वत्र पोलिसांची बंदोबस्त होता. या बंदोबस्ताचा आढावा घेत स्वतः पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डीयांनी थर्टी फर्स्टच्या रात्री १२ वाजता स्वतः ऑन रोड शहरातील बहुतांश भागात पाहणी केली.

विशेषतः राजकमल चौकात पोहचून पोलिस बंदोबस्ताचा आढावा घेतला. यावेळी उपायुक्त सागर पाटील , गणेश शिंदे व अन्य पोलिस कर्मचारी उपस्थित होते.यावेळी दुचाकी चालकांची बारकाईने तपासणी करण्यात आली. पोलिस आयुक्तनविनचंद्र रेड्डी यांनी स्वतः बंदोबस्ता विषयी निर्देश दिले.

सुरक्षेच्या दृष्टीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुचना दिल्या. यावेळी पोलिस आयुक्तालया तील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पेट्रोलिंगमध्ये सहभाग घेतला. शहरातील प्रमुख चौकावर पोलिसांचा कडक बंदोबस्त होता. तसेच उड्डाणपुलावर बॅरिकेटस लावून वाहतूक बंद करण्यात आली होती. रात्री उशिरापर्यंत शहरात ठिकठिकाणी पोलिस दिसून येत होते. गाडगेनगर, राजापेठ, वेलकम पॉईंट,पंचवटी, उड्डाणपुलच्या दोन्ही बाजुनी बॅरीकेटस लावले होते.

इर्विन चौक, राजापेठ, जयस्तंभ, गाडगेनगर, राजकमल या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त होता. येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. ड्रंकन ड्राईव्ह अंतर्गत तपासणी करण्यात आली.येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. ड्रंकन ड्राईव्ह अंतर्गत तपासणी करण्यात आली.सरत्या वर्षाला निरोप देत नागरिकांचा जल्लोष सुरु होता. तर दुसरीकडे कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मंगळवारला सायंकाळी ६ वाजतापासूनच ८० अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात ८०० पेक्षा अधिक पोलिस शहरातील विविध चौकांसह विविध भागात तैनात होते. एवढेच नाही तर मद्यपी वाहन चालकांच्या मुसक्या आवळण्यासाठी ड्रंकन ड्राईव्ह मोहिम सुद्धा राबविण्यात आली. तर फिक्स पाईन्ट व नाकाबंदीव्दारे प्रत्येकावर पोलिसांची करडी होती.


सायंकाळी ६ वाजतापासून ते १ जानेवारीच्या पहाटे ५ वाजेपर्यंत डीसीपी, एसीपी, पीआय, एपीआय, पीएसआय अशा ८० अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात तब्बल ८००. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता. सोबतचगुन्हे व वाहतुकशाखेचीविविधपथकांचीशहरात गस्त रात्रभर सुरु होती. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रमुख चौकांमध्ये बॅरिगेट लाऊन नाकाबंदी करून संशयितांची तपासणी करण्यात येत होती.

# गोवश तस्करी करणाऱ्या १० वाहनांचे परवाने निलंबित

## एलसीबीची धडाकेबाज कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** – एलसीबीच्या पथकाने २०२४ मध्ये जिल्हयाच्या ग्रामीण भागात १० ठिकाणी गोवंशाची कारवाई करून वाहने जप्त केली. तसेच गोवंशांची तस्करी करणाऱ्या वाहनाचे परवाने निलंबीत करण्याचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे पाठविला. एलसीबीचा अहवाल येताच प्रादेशिक परिवहन कार्यालयाने तात्काळ कारवाई करित १० वाहनांचे परवाने ९० दिवसांसाठी निलंबीत केल. आरटीओच्याया कारवाईमुळे गोवंश तस्करांसह वाहन मालकांचे धाबे चांगलेच दणाणले आहेग्रामीणमधील एलसीबीचे प्रमुख पीआय किरण वानखडे यांनी २०२४ मध्ये ग्रामीण भागात अनेक गोवंश तस्करांवर कारवाई केली. यामध्ये मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीत जप्त केलेल्या ४ टाटा सुमारे, २ टाटा एस कंपनीचे मालवाहू अॅपे, चांदुर रेल्वेपोलिस ठाण्याच्या हद्दीत ४ टाटा एस कंपनीचे अॅपेअसे एकूण १० वाहने एलसीबीने जप्त केली. या कारवाईनंतर एलसीबीच्या पथकाने गोवंश तस्करांवर संबधीत पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल केले व वाहने जप्त करून मालखान्यात जमा केले. परंतु, पीआय किरण वानखडे यांनी एवढ्यावरच न थांबता गोवंश तस्करीच्या मुसक्या आवळण्यासाठी गुन्ह्यात जप्तझालेल्या १० वाहनांनाचे परवाने निलंबीत करण्याचा प्रस्ताव तयार करून पोलिस अधिक्षकविशाल आनंद यांच्याकडे सादर केला. एसीपी विशाल आनंद यांनी हा प्रस्ताव तात्काळ मजूर करून आरटीओ कार्यालयाकडे पाठविला. आरटीओ कार्यालयाने सुध्दा एसपी विशाल आनंद यांच्या अहवालावर तात्काळ कारवाई करित गोवंशाची तस्करी करणाऱ्या १० वाहनांचा वाहन



परवाना ९० दिवसांसाठी निलंबीत केला आहे. आरटीओच्या या कारवाईमुळे जिल्हयातील गोवंश तस्करांसह वाहन मालकांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.

# स्कुल कनेक्ट अभियानांतर्गत १ ते १५ जानेवारी दरम्यान

## नववी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्रित सर्व महाविद्यालयांमधील इयत्ता नववी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्कुल कनेक्ट २.० अभियानांतर्गत मार्गदर्शनपर विविध कार्यशाळांचे आयोजन सर्व महाविद्यालयांमध्ये करण्यात येणार आहे. या कार्यशाळांमधून विद्यार्थी तसेच पालकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मधील विद्यार्थी केंद्रीबदल आणि त्यांच्या हितकारक परिणाम, विद्यापीठांनी तयार केलेल्या अनुभवाधिष्ठित, बहुविद्याशाखीय लवचिक अभ्यासक्रम, मूल्यमापनातील श्रेयांक पध्दती आणि त्यामुळे आलेली लवचिकता, कल्पक, व्यावसायिक आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शिष्यवृत्ती, विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध असलेल्या संधी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील विद्यार्थी केंद्रीबदल, बारावीनंतर आवडीचे अभ्यासक्रम निवडण्यासाठी मार्गदर्शन, दहावीनंतर रोजगाराभिमुख अभ्यासक्रमासाठी असलेल्या संधी, पदवी अभ्यासक्रमातील संधी, पदवी स्तरावर विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांमध्ये कॅम्पस टूरचे आयोजन करणे, विविध प्रयोगशाळा, उपकरणे, विविध भौतिक सुविधा आदी बाबींविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.



यासंदर्भात विद्यार्थ्यांनी तसेच महाविद्यालयांचे प्राचार्य, माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी (इयत्ता नववी ते बारावी) त्यांच्या तालुक्यामधील नजीकच्या महाविद्यालयांशी संपर्क साधावा व विद्यार्थी उपयोगी अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांचेशी मो. क्र. ९४२३१२४८८२, संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# वर्षभरात एक्साईजच्या छाप्यांमध्ये १.९७ कोटीचा माल जप्त

## १६२३ छापे, १८० आरोपींना अटक




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** मावळत्या वर्षात राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत जिल्ह्यात अवैध दारू निर्मिती आणि दारूची तस्करी विरोधात १६२३ छापे टाकण्यात आले. त्यामध्ये १८० आरोपींना अटक करण्यात आली असून सुमारे १.९७ कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. ज्यामध्ये ४० लाख रुपयांच्या ७५ वाहनांव्यतिरिक्त १.५७ कोटी रुपयांचे साहित्य आणि ४० लाख रुपयांची ७५ वाहने जप्त, दारू व इतर साहित्याचा समावेश होता.


या संदर्भात उत्पादन शुल्क विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्पादन शुल्क विभागाच्या अमरावतीअचलपूर, चांदूर बाजार आणि मोर्शी निरीक्षक कार्यालयांसह खरपी व वरुड चेकपोस्टसह भरारी पथकांनी गावठी दारू आणि अवैध देशी–विदेशी दारूचे उत्पादन शोधून काढले. देशी–विदेशी दारूची तस्करी रोखण्यासाठी वर्षभरात युद्धपातळीवर कारवाई करण्यात आली असून अवैध दारू व्यवसायात सहभागी असलेल्या आरोपींना अटक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर छापे टाकण्यात आले, तसेच अवैध दारूची खेप, उत्पादनासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले. दारू आणि दारू तस्करीत वापरलेली वाहने जप्त केली. याशिवाय येत्या वर्षभरातही अवैध मद्यविक्री विरोधात सातत्याने छापेमारी सुरूच राहणार असल्याचे उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे.

# संत गुलाबराव महाराजांची जयंती शासनाच्या दिनविशेष यादीत समाविष्ट करा

## वारकरी शिक्षण संस्थेच्यावतीनें शासनाकडे प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** – विदर्भातील महान संत श्री गुलाबराव महाराज यांच्या जयंतीला महाराष्ट्र शासनाच्च्या दिनविशेष यादीत समाविष्ट करण्याची मागणी चांदूरबाजार तालुक्यातील तिर्थक्षेत्र बेलोरा, वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने शासनाकडे केली आहे.संत गुलाबराव महाराज हे एक अद्वितीय तत्त्वज्ञानी आणि धार्मिक नेतृत्व होते. त्यांचा जीवन आणि कार्य आजही समाजाला प्रेरणा देत आहे. त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी ६ जुलै रोजी त्यांची जयंती सरकारी मान्यताप्राप्त दिनविशेष म्हणून साजरी केली जावी, अशी या मागणीमागील भावना आहे. संत गुलाबराव महाराजांनी नास्तिकतेचे खंडन करून श्रद्धा, सत्य आणि मानवतेच्या मूल्यांचा प्रचार केला, जे त्यांच्या विचारधारेचे मुख्य अंग होते. त्यांचे साहित्य केवळ धार्मिक आणि तत्त्वज्ञानात्मक बाबींमध्ये न राहता, सामाजिक, सांस्कृतिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून देखील अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. विशेषत : संत गुलाबराव महाराजांचा प्रभाव केवळ विदर्भातच नाही तर महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये देखील मोठा आहे. वारकरी शिक्षण संस्था तिर्थक्षेत्र बेलोराचे पदाधिकारी आणि प्रसिद्धी प्रमुख श्री माधुर्य विस्मय ठाकरे यांच्या नेतृत्वात या मागणीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर करण्यात आला. ठाकरे यांनी सांगितले की, संत गुलाबराव महाराजांचे कार्य केवळ धार्मिक योगदानापुरते मर्यादित न राहता, त्यांचे विचार शैक्षणिक, सांस्कृतिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून देखील अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांची जयंती सरकारी मान्यताप्राप्त दिनविशेष म्हणून साजरी केल्यास त्यांचे साहित्य आणि विचार अधिक व्यापक प्रमाणावर प्रसूत होऊ शकतील. संत गुलाबराव महाराजांचे जीवन आणि कार्य समाजाच्या विविध क्षेत्रांत प्रभावी ठरले आहे. त्यांच्या बालवयातील संस्कार आणि जीवनदृष्टीमुळे अनेक मुलांनी योग्य शिक्षण घेतले आहे. त्यांचे विचार आजही लाखो लोकांच्या जीवनात परिवर्तन घडविणारे ठरले आहेत. त्यांच्या लेखनामुळे आजची पिढी धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, आणि समाजकारण याबद्दल अधिक जागरूक झाली आहे. या मागणीला महाराष्ट्र शासनाकडून लवकर मान्यता मिळावी, अशी आशा व्यक्त केली जात आहे.–



# ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा

## अमरावती केंद्रातून 'द वल्चर अँड द लिटिल गर्ल' प्रथम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत अमरावती केंद्रातून पंचशील बहुउद्देशीय स्वयंसेवी संस्था, अमरावती या संस्थेच्या द वल्चर अँड द लिटिल गर्ल या नाटकाला प्रथम पारितोषिक झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केली आहे.

या नाटकाची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे अमरावती केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे अंबापेठ क्लब या संस्थेच्या 'होमीसाईड' या नाटकास द्वितीय पारितोषिक तसेच गंधर्व बहुउद्देशीय संस्थेच्या थलाई कुत्थल या तृतीय – पारितोषिका नाटकासाठी आहे. पारितोषिक प्राप्त झाले राहुल – वासनकर चाटकारिवाल्वर अँड दलिटिल गर्ल), द्वितीय पारितोषिक सचिन गोटे (नाटक– होमसाईड), प्रकाश योजना प्रथम पारितोषिक दिपक नांदगांवकर (नाटक–थलाई कुत्थल), द्वितीय पारितोषिक अमोल आढाव (नाटक –दवल्चर अँडदलिटिलगर्ल), नेपथ्यः प्रथम पारितोषिक ऍड प्रशांत देशपांडे. (नाटक– होमीसाईड) द्वितीय पारितोषिक चेतन बरदिवे (नाटक अंधारडोह), रंगभूषा : प्रथम पारितोषिकनिलेशदद्गाळ (नाटक– स्वधर्म), द्वितीय पारितोषिक लालजी श्रीवास (नाटक – थलाई कुत्थल) उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक गणेश वानखडे (नाटक – द वल्चर अँड द लिटिल) व शर्वरी ठाकरें (नाटक– होमीसाईड), अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे शिल्पा धुंडियाल (नाटक–दसवा), रचना अष्टीकर (नाटक–थलाई



कुत्थल), संगीता कडू (नाटक– स्वधर्म), रीध्दी गजानन चाबूकस्वार (नाटक–मोठ्यांचा शेक्सफियर), विनोद सुरोसे (नाटक–थलाई कुत्थल), प्रसाद खरे (नाटक– स्वधर्म), गोपाल दामदार ४. दसवा), आकाश सतीश पांडे (नाटक–मोठ्यांचा शेक्सफियर) १३ ते २६डिसेंबर कालावधीत सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे झालेल्या या स्पर्धेत एकूण १० नाट्यप्रयोग सादर करण्यात आले परीक्षक म्हणून चंद्रकांत शशिकांत चौधरी आणि कीर्ती मानेगांवकर यांनी काम पाहिले.

# नवीन वर्षाचं स्वागत कडाक्याच्या थंडीनं होणार, जानेवारीत कसं असेल हवामान? पंजाबराव डखांनी वर्तवला नवीन अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१मुंबई–** : राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं थंडीचा कडाका जाणवत आहे. तर कुठं ढगाळ वातावरण जाणवत आहे. दरम्यान, काही तासातच नवीन वर्ष २०२५ ला सुरुवात होणार आहे. त्यासाठी सर्वजण सज्ज झाले आहेत. दरम्यान, या नवीन वर्षात नेमकं वातावरण कसं असेल, याबाबतची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

नवीन वर्ष जानेवारी २०२५ चे स्वागत कडाक्याच्या थंडीनं होणार असल्याची माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे.१ जानेवारीपासून महाराष्ट्रात कुठेच पाऊस पडणार नसल्याची माहिती पंजाबराव डखांन दिली आहे. आज राज्यात कडाक्याच्या थडीचा अंदाज डखांनी वर्तवला होता. त्यानंतर मात्र, राज्यात थंडीचा जोर वाढणारक आहे. त्यामुळं नागरिकांनी वाढत्या थंडीमुळं योग्य ती काळजी घेण्याच आवाहन करण्यात आलं आहे.

१ जानेवारीपासून १५ जानेवारी पर्यंत महाराष्ट्रात कडाक्याची थंडी पडणार

पंजाबराव डखांनी दिलेल्या माहितीनुसार १ जानेवारीपासून १५ जानेवारी पर्यंत महाराष्ट्रात प्रामुख्याने हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.



म्हणजेच नवीन वर्षाचे स्वागत कडाक्याच्या थंडीने होणार असा अंदाज पंजाबराव डखांनी वर्तवला आहे. त्यामुळं वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

दरम्यान, हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ जानेवारीपासून त्यापुढील पाच दिवसासाठी म्हणजे मंगळवार दिनांक ७ जानेवारीपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात थंडी जाणवण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यातही विशेषतः उत्तर महाराष्ट्र व उत्तर विदर्भातील नंदुरबार धुळे जळगांव नाशिक, नगर छत्रपती संभाजीनगर अमरावती अकोला नागपूर भंडारा गोंदिया या जिल्ह्यात त्या पाच दिवसात थंडीचा प्रभाव अधिक राहील, अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात पावसाची शक्यता नसल्याची माहिती देखील खुळे यांनी दिली आहे. पुढचे काही दिवस थंडीचे आहेत. शेतकऱ्यांनी, रब्बी पिकांचे सिंचन, तणनियंत्रण व खत नियोजन यांचा मेळ घालून पीक वाढीचा वेग–दर साधावा. या दिवसाच्या थंडीचा लाभ उठवावा. हवामान विभागाने वर्तवलेल्या शक्यतेनुसार, उत्तरेकडील राज्यांनंतर आता राज्यातही काही भागात थंडीच्या लाटेला सुरुवात होणार आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात थंडीची लाट असून पहाटे दाट धुक्याची चादर, तापमान निचांकी राहण्याची शक्यता आहे. राज्यात उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात तापमानाचा पारा खालावलाय.

# अडगावच्या शाळेतील आहार सील

## सध्या दुसऱ्या शाळेतून आहार पुरवठा, शिक्षणाधिकाऱ्यांनी घेतली बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** मध्यान्ह भोजनातून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्यामुळे मोर्शी तालुक्यातील अडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शालेय पोषण आहाराचे सर्व कच्चे साहित्य जप्त करून त्याचे नमुने अन्न व औषधी प्रशासनाकडे पाठवण्यात आले आहे. सध्या दुसऱ्या शाळेतून विद्यार्थ्यांना पोषण – आहार पुरवला जात आहे.

या पार्श्वभूमीवर शिक्षणाधिकारी अरविंद मोहिरे यांनी मंगळवारी जिल्ह्यातील सर्व शालेय पोषण आहार अधीक्षकांची बैठक घेतली. या बैठकीला शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह जिल्ह्यातील २२ शालेय पोषण आहार अधीक्षक उपस्थित होते. या सर्वांना आठवड्यातून किमान एकदा शाळांना भेट देऊन तेथील शालेय पोषण आहाराची तपासणी करणे बंधनकारक केले आहे. याशिवाय स्वतः शिक्षणाधिकारी मोहिरे हे सुद्धा काही शाळांना आकस्मिक भेटी देऊन तेथील शालेय पोषण आहाराचा आढावा घेणार आहेत. दरम्यान अडगाव येथील विद्यार्थ्यांना सध्या तेथील खासगी व्यवस्थापनाच्या प्रगती विद्यालयातून शालेय पोषण आहार पुरवण्यात येत आहे.

शनिवारी दुपारी शिजवलेला शालेय पोषण आहार सेवन केल्यानंतर त्या शाळेतील ३२ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली होती. हे सर्व विद्यार्थी रविवारच्या सायंकाळपर्यंत दवाखान्यात दाखल झाले होते. त्यापैकी १७ जणांवर अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात तर एकावर डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात (पीडीएमएमसी) उपचार सुरू आहे. गेल्या दोन दिवसांत यापैकी काही विद्यार्थ्यांना सुटी देण्यात आली असून, येत्या एक–दोन दिवसांत सर्व विद्यार्थ्यांना सुटी दिली जाईल, असे वैद्यकीय सूत्रांचे म्हणणे आहे.

# वाल्मिक कराडची सीआयडी चौकशी, विचारले 'चार ' प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१पुणे** – बीड जिल्ह्यातील केजच्या मस्साजोग येथील माजी सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात मुख्य सूत्रधार समजल्या जाणाऱ्या वाल्मिक कराड याने आज पुणे पोलिसांना आणि सीआयडीला आत्मसमर्पण केलं आहे. आज सकाळी स्वत:चा एक व्हिडिओ बनवून कराडने सोशल मिडियावर पोस्ट केला. त्यानंतर तो पुण्याच्या पाषाण परिसरातील सीआयडी कार्यालयात सरेंडर झाला. त्यानंतर साधारण दुपारी १२.३० वाजल्यापासून त्याची चौकशी सुरू होती.

राज्यात वेगवेगळ्या भागात सीआयडीने कराडच्या शोधासाठी पथक रवाना केले होते. तरी त्याचा शोध लागला नव्हता. त्यानंतर आज तो पोलिसांना शरण आल्यावर वाल्मिक कराड याला चौकशी दरम्यान पोलिसांनी चार महत्वाचे प्रश्न विचारले. यात गेल्या २२ दिवसांपासून कराड कुठे होता? सरपंच देशमुख प्रकरणात त्याचा काय संबंध



आहे, असे सवाल करण्यात आले. वाल्मिक कराड याला पोलिसांनी चार प्रश्न केले. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यापासून २२ दिवस कराड कुठे होता? माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात काय संबंध आहे? खंडणीचं प्रकरण नेमकं काय आहे? आणि यादरम्यान कुणाशी संपर्कात होता? असे प्रश्न पोलिसांनी चौकशी दरम्यान वाल्मिक कराडला विचारले आहेत.

## एसपी विशाल आनंद यांचे आणखी एक गिफ्ट

# नववर्षात ग्रामीण पोलिस दलात नेल्सन कार्यप्रणाली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** – एसपी विशाल आनंद यांनी १ जानेवारी २०२५ पासून पोलिस दलातील सर्व अधिकार, कर्मचाऱ्यांचे सेवापट व कार्यालयीन कामकाज ई–एचआरएमस प्रणाली व्दारे ऑनलाईन सुरू करून सुरूवात गोड केली. अशातच आता एसपी विशाल आनंद यांनी ग्रामीण पोलिसांना आणखी एक गिफट दिले आहे. नविन वर्षात मनुष्यबळाचे व इतर तपास कामांचे नियोजन करण्यासाठी आता नेल्सन कार्यप्रणाली सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीव्दारे अधिकारी, कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होईल.अमरावती ग्रामीण पोलिस दलात गेल्या काही वर्षात दाखल झालेले नविन पोलिस पदवीधर असून त्यांना संगणक, टायपिंग, इंग्रजी, मराठी टायपिंगचे ज्ञान आहे. त्याचा फायदा पोलिस विभागाला होऊन मनुष्यबळावर येणारा तान कमी होईल म्हणून ग्रामीण पोलिस दलात १ जानेवारी २०२५ पासून नेल्सनपासून नेल्सन कार्यप्रकरणी अंमलात येणार आहे. पोलिस ठाण्यात बरेच अधिकारी, कर्मचारी बिटमध्ये नेमलेले असतात. त्यांच्याकडे पोलिस ठाण्याचे कोणतेही महत्वाचे स्वतंत्र काम नसल्यामुळे अशा पोलिस अधिकारी,कर्मचाऱ्यांना तपास पध्दती, अचानक उद्भवलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हातळण्याचे कौशल्या, तसेच



जनसंपर्क ईत्यादी कामकाजाचे अनुभव येत नाही. ज्यामुळे वेळप्रसंगी परिस्थितीला समोर त्यांना ते गोंधळत असल्याने कामकाजास विलंब होतो आणि त्याचा तान इतर कर्मचाऱ्यांवर पडतो. यामुळेच प्रलंबित गुन्ह्याचे प्रमाण वाढले.यासाठी यापुढे पोलिस ठाण्यातील महत्वाचे जसे क्राईम रायटर, खुपिया, बारनिशी, हेड मोहरर हे काम पाहणारे पोलिस व्यतिरिक्त सर्व अधिकारी, कर्मचारी यांना पोलिस ठाण्यातील बीटमध्ये नेमण्याकरितावत्यांच्याकडेबिटमधील तपास, अर्ज चौकशी हे कामकाज सोपविणे या प्रामुख्याने नेल्सन कार्यप्रणालीमध्ये अंतर्गतभुत राहणार आहे.

## नवीन वर्षात महावितरणची ग्राहकांना भेट

# गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडा व वीजबिलात एक रकमी १२० रुपये सूट मिळवा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१ अमरावती–** नूतन वर्षांची भेट म्हणून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्याची घोषणा महावितरणने केली आहे.

महावितरणकडून 'कागद वाचवा, पर्यावरण वाचवा' या संकल्पनेनुसार गो–ग्रीन सेवा राबविण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी या योजनेअंतर्गत ग्राहकांना मासिक वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येते. मात्र आता यापुढे पहिल्याच बिलात पुढील बारा महिन्यासाठी तत्काळ १२० रूपये एकरकमी सवलत मिळणार आहे.

गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडणार् या ग्राहकांना महावितरणकडून दरमहा छापील कागदी बिला ऐवजी ई – मेल द्वारे वीज बिल पाठविण्यात येते. शिवाय गो ग्रीन ग्राहकांना मासिक वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येते. महावितरणने गो ग्रीन ग्राहकांसाठी हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता यापुढे गो ग्रीन सेवा निवडणाऱ्या ग्राहकांना दरमहा ऐवजी पहिल्याच महिन्यातील




वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येणार आहे.महावितरणच्या ३ कोटी लघुदाब ग्राहकांपैकी अद्यापपर्यंत ४ लाख ६२ हजार म्हणजेच १.१५ टक्के ग्राहकांनी गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडला आहे. भविष्यात हे प्रमाण वाढावे, या हेतूने महावितरणने गो ग्रीन पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना वीजबिलात तत्काळपणे १२० रुपये एकरकमी सुट देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व नोंदणीकृत वीज ग्राहकांना महावितरणकडून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडण्यासाठी एसएमएस पाठविण्यात येणार आहे. गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील वर्षभर व सेवेसाठी नोंदणी रद्द करेपर्यंत नोंदणीकृत ई–मेलवर वीज बिल पाठविण्यात येणार असून त्यापुढे दरमहा वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येणार आहे. ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे महावितरणने आवाहन केले आहे. गो ग्रीन सुविधेचा लाभ घेण्यासाठी महावितरणच्या ु.ारहरवळीलो.ळप या संकेतस्थळाला भेट द्या व गो ग्रीन चा पर्याय निवडा.

## २०२३ च्या तुलनेत चोरी, मारामारी, बलात्कार अशा गुन्ह्यात घट –पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी

# खुनाच्या गुन्ह्यात मात्र ३ ने वाढ

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१अमरावती–** फोटो घेणेसरत्या वर्षात आयुक्तालयाच्या हद्दीत २०२३ च्या तुलनेत चोरी, मारामारी, बलात्कार अशा गुन्ह्यात घट झाली आहे. मात्र वर्षभरात ३२ खून तसेच ४९ गुन्हे हे खुनाच्या प्रयत्नाचे दाखल झाले आहेत. २०२३ च्या तुलनेत खुनाच्या गुन्ह्यात ३ ने वाढ झाली आहे. दरम्यान सर्व खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींच्या पोलिसांनी वेळीच मुसक्या आवरल्या असल्याची माहिती पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी मंगळवारी माध्यम प्रतिनिधींना दिली.शहरात शांतता रहावी, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शहर पोलिस चोवीस तास कार्यरत आहेत. वर्ष २०२४ मध्ये ११ गुंडांवर एमपीडीएअन्वये कारवाई करण्यात आली. तर, ८६ जणांना शहर, जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. गंभीर प्रकरणातील ५९५ गुन्हेगारांवर बीएनएनएच्या कलम १२९ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. त्यामुळे मारामारीच्या गुन्ह्यात ११७ ने घट झाली आहे. याचवेळी घरफोडी, चोरीच्या गुन्ह्यात ३७१ गुन्ह्यांची घट आली आहे. तसेच



बलात्काराचे ९९ गुन्हे दाखल असून, २०२३ मध्ये ११९ गुन्हे दाखल होते. या गुन्ह्यात २० ने घट झाली आहे. लुटमारीच्या गुन्ह्यात चारने घट झाली आहे.शहरातील मुख्य चौक व मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने ७२१ सीसीटीव्हीचा सुधारित प्रस्तावडी पीसीला दिला आहे. मात्र अद्याप निधी मिळालेला नाही.

नववर्षात पुन्हा त्या प्रस्तावाचासकारात्मक पाठपुरावा करण्यात येईल, असेही पोलिस आयुक्तांनी सांगितले आहे.

### शहर पोलिसांसमोर आव्हान उभे करणारे गुन्हे; आरोपी अटकेत

अकोली परिसरात डोकं नसलेला मृतदेह, बडनेरा रेल्वे स्टेशनच्या पार्किंग परिसरात आढळलेला अज्ञात महिलेचा मृतदेह, या दोन्ही प्रकरणात कुठलाही सुगावा नव्हता. मात्र काही तासांतच शहर पोलिसांनी त्या घटनेची उकल केली. सुवर्णकार जारेंची लूट, नायब तहसीलदारांच्या घरी झालेली भरदिवसा लूटमार, कठोरा नाका परिसरातील संमती कॉलनी भागातील हिट अँड रन प्रकरण हे सर्व गुन्हे शहर पोलिसांसाठी आव्हान होते, मात्र पोलिसांनी त्या गुन्ह्यांची उकल करून आरोपींना पकडले आहे.

# अतिवृष्टी व गारपीटचे रखडलेले अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ द्या: अन्यथा उच्च न्यायालयात याचिका दाखल करू

## , किसान न्याय हक्क संघर्ष समितीचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** अतिवृष्टी व गारपीटचे रखडलेले अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ द्या अन्यथा उच्च न्यायालयात याचिका दाखल करू, असा इशारा किसान न्याय हक्क संघर्ष समितीने दिला आहे. वरूड तालुक्यात सन २०२३ मध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले. परिणामी शासनाने हेक्टरी अनुदान जाहीर केले होते. परंतु त्या अनुदानाची रक्कम अजूनही अप्राप्त आहे.



शेतकऱ्यांना शासनाने तीन हेक्टरपर्यंतच्या मर्यादेत अनुदान जाहीर केले होते. परंतु प्रशासनाच्या दिरंगाईमुळे अजूनही अनुदान प्राप्त झाले नाही. दरम्यानच्या काळात एप्रिल २०२४ मधे वरूड तालुक्यात गारपीट झाली. त्यावेळीही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शासनाने गारपीटग्रस्तांनाही अनुदान जाहीर केले. परंतु त्यामध्ये प्रशासनाच्या चुकीने पन्नास हजार रुपयांच्यावर मिळणारे अनुदान अडकले आहे.

अनुदानाच्या रकमेसाठी शेतकरी रोज तहसील कार्यालयात हेलपाटे मारत आहेत. तहसील प्रशासन सांगते की काही दिवसात पैसे येणार पण ही निव्वळ शेतकरी यांची दिशाभूल आहे. त्यासाठी आता शेतकरी न्याय हक्क समितीने वरूडचे तहसीलदार, अमरावतीचे जिल्हाधिकरी व शासनाला निवेदन देऊन यावर तोडगा काढून सर्व पात्र उर्वरित शेतकऱ्यांना अतिवृष्टी व गारपीट चे अनुदान द्या, असे निवेदन दिले आहे. यावेळी संघर्ष समितीचे पदाधिकारी सप्नील खांडेकर, तृषार निकम, नरेंद्र उर्फ बबलू पावडे, सुधाकर दोंड, बाबाराव मंगुळकर, मोहन खुजे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# थर्टी फर्स्टला चिखलदऱ्यात पर्यटकांचा निरुत्साह पर्यटकांची संख्या दरवर्षीच्या तुलनेत अल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१चिखलदरा–** दरवर्षी चिखलदऱ्याला थर्टी फर्स्टला पर्यटकांची चांगली गर्दी राहते. यंदा मात्र अपवाद आहे. ३१ डिसेंबरला चिखलदऱ्यात पोहोचलेल्या पर्यटकांची संख्या दरवर्षीच्या तुलनेत अल्प होती. रात्री साडेआठ वाजताच चिखलदऱ्यातील मुख्य चौक व मार्ग शांत दिसत होते. यावरून चिखलदऱ्यात जाऊन थर्टी फर्स्ट साजरा करणाऱ्यांमध्ये निरुत्साह दिसत आहे.




चिखलदऱ्याला दरवर्षी ३१ डिसेंबरला मोठ्या संख्येत पर्यटक जात असतात. यंदा मात्र ३१ डिसेंबरला सुटीच्या दिवशी किंवा शनिवारी, रविवारी पर्यटकांची जी गर्दी राहते, त्यापेक्षाही कमी पर्यटक दाखल झाल्याचे काही स्थानिकांनी सांगितले आहे. अनेक हॉटेल्सच्या खोल्या रिकाम्या आहेत. रस्ते शांत आहेत. मुख्य बाजार ओळीतही फारशी वर्दळ नाही, असे स्थानिकांनी सांगितले आहे.

# नववर्षाची सुरुवात देवदर्शनाने; पंढरपूर, तुळजाभवानी, शिर्डी, सप्तशृंगी गडावर भाविकांची दर्शनासाठी गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१पंढरपूर**

२०२४ वर्षाला निरोप देत २०२५ या नववर्षाला सुरवात झाली आहे. अनेकांनी रात्री उशिरापर्यंत पार्ट्या करत नववर्षाचे स्वागत जल्लोषात केले. परंतु काही जणांनी नववर्षाची सुरवात देवदर्शनाने करण्याच्या उद्देशाने राज्यातील तीर्थस्थळी जाणे पसंत केले. यामुळे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी पंढरपूर, तुळजापूर, त्रंबकेश्वर, सप्तशृंगी गड, शिर्डीचे साईबाबा मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी झाली असल्याचे पाहण्यास मिळाले आहे.



**साई नामाच्या जयघोषाने दुमदुमली साईनगरी**

देश विदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या साईनगरी भक्तांच्या गर्दीने फुलून गेली आहे. नववर्षाची सुरूवात साई दर्शनाने करण्यासाठी लाखो साईभक्त शिर्डीत दाखल झाले आहेत. नववर्षाच्या स्वागताचा मोठा उत्साह शिर्डीत बघायला मिळत असून साईनामाच्या जयघोषाने शिर्डी नगरी दुमदूमन गेली आहे.

**त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी दीड किलोमीटरपर्यंत रांग**

**नाशिक :** नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्रंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. त्यामुळेच मंदिराच्या बाहेर एक ते दीड किलोमीटर पर्यंत दर्शनासाठी रांगा लागल्या आहेत. तर चार ते पाच तास रांगेत उभे राहून दर्शनाला लागत आहे. नवीन वर्षाचे पहिले दिवशी भारताच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक नाशिकमध्ये दाखल झाले असून सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे अनेकांनी पर्यटनाबरोबरच मंदिरात दर्शनाचा योग जुळून आणला आहे. त्यामुळे सर्व पर्यटन स्थळ आणि देवस्थानंवर मोठ्या संख्येने गर्दी बघायला मिळत आहे.

**विठ्ठुरायाला पाच हजार संत्र्यांचा नैवद्य**

**पंढरपूर :** नवीन वर्षाच्या निमित्ताने विठ्ठुरायाला पाच हजार संत्र्यांचा महानैवद्य दाखवण्यात आला आहे. पुणे येथील भाविक प्रदीप सिंह ठाकुर यांच्यावतीने विठ्ठल मंदिरातील गाभाऱ्यात संत्र्यांची व पानाफुलांची आरास केली आहे. यामध्ये सुमारे पाच हजार संत्र्यांचा आणि तीनशे किलो विविध पाना फुलांचा वापर केला आहे. संत्र्यांची आरास केल्याने देवाचे रूप अधिकच खुलून दिसत आहे. इतकेच नाही तर विठ्ठुरायाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरमध्ये भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत.

**सप्तशृंगगडावर भाविकांची गर्दी**

**नाशिक :** नववर्षाच्या स्वागतासाठी साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्धपिठ असलेल्या नाशिकच्या श्री. क्षेत्र सप्तशृंग गडावर भाविकांनी आज गर्दी केली. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य व परराज्यातील भाविकांनी सप्तशृंग गडावर कालपासून हजेरी लावली होती. भाविकांची गर्दी पाहता आदिमायेच्या दर्शनासाठी मंदिर प्रशासनाने २४ तास मंदिर दर्शनासाठी खुले ठेवले आहे. नवीन वर्षाची सुरुवात चांगली व्हावी; या उद्देशाने आदिमायेचे दर्शन घेवून नव्या वर्षाची सुरुवात केली. पहाटे पासून भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. अनेकांनी आदिमायेचे दर्शन घेत नववर्षाचे संकल्प करत येणारे वर्ष सुखाने आनंदाने जावो, संकटे दूर व्हावे अशी देवी चरणी प्रार्थना केली.

**तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी नवरात्र महोत्सव**

नविन वर्षाच्या निमित्ताने हजारो भाविकांनी आज तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. दरम्यान गेली आठ ते दहा दिवसापासून तुळजापूरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. मात्र रात्रीपासुन तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी नवरात्र महोत्सव पुर्वीच्या मंचकी निद्रेला प्रारंभ झाला आहे. त्यामुळे तुळजाभवानी माता शेजगृहातील चांदीच्या पलंगावर विसावली आहे. त्यामुळे भाविकांची गर्दी देखील काही प्रमाणात घटली असुन ७ जानेवारीला तुळजाभवानी मातेची मंचकी निद्रा संपवुन सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. शाकंभरी नवरात्र महोत्सवाला सुरुवात होणार त्यामुळे पुन्हा भाविकांची गर्दी वाढणार आहे.

**जेजुरी गडावर भाविकांची गर्दी**

**बारामती :** नव वर्षाच्या पहिल्या दिवशी अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरी गडावर खंडेरायाच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. नववर्षाच्या पूर्वसंध्येला काल जेजुरीमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले होते. आज सकाळपासूनच नव वर्षाच्या पहिल्या दिवशी भाविकांनी गडावर खंडेरायाच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

# अप्पर वर्धा कालव्याच्या पाझराने पिकांची नासाडी

## दहा वर्षांपासून तक्रारींकडे दुर्लक्ष शेतकरी पिकांच्या नुकसानामुळे झाले त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

गेल्या दहा वर्षांपासून तालुक्यातील भांबोरा येथील शेतकरी दिनकर दयारामजी खंडार अप्पर वर्धा कालव्याच्या पाझराने त्रस्त आहेत. परंतु वारंवार तक्रार देऊनही संबंधित विभागाने शेतात पाझरणाऱ्या पाण्याचा बंदोबस्त केला नाही. याउलट शेतकऱ्याला उडवाउडवीची उत्तरे देऊन शेतकऱ्याला मानसिक त्रास दिला असल्याची तक्रार शेतकऱ्याने उर्ध्व वर्धा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे केली आहे.

मौजा भांबोरा येथे अप्पर वर्धा धरणाच्या उजव्या मुख्य कालव्याला लागून गट नं. १६४ क्रमांकाचे शेत आहे. परंतु, रब्बी हंगामातील पिकांसाठी अप्पर वर्धा कालव्याला धरणातून पाणी सोडण्यात येते. तेव्हा कालव्याला जागोजागी भगदाडे पडल्यामुळे कालव्यातील पाणी शेतात साचत असल्याने पिकांची नासाडी होऊन शेतकऱ्याला दरवर्षी आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. परंतु अद्यापही उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाकडून प्रत्यक्ष पाहणी करून कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.

**कालव्याची डागडुजीच नाही**

कालव्याची निर्मिती झाल्यापासून कालव्याची डागडुजी नियमित करण्यात येत नाही. त्यामुळे लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होतो. शेतातील पिकांचे नुकसान होते.

**द्वारबंद दालनात बसतात अभियंता**

तालुक्याच्या कार्यालयात उपविभागीय अभियंत्याचे दालन आहे. परंतु, ते कार्यालयात हजर असतानाही दालन द्वारबंद असते.

# ‘निराधार’, ‘श्रावणबाळ’चे पैसे थेट खात्यात जाणार कालापव्यय टाळण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यांसारख्या विशेष साहाय्य योजनांच्या लाभार्थींच्या थेट बँक खात्यात (डीबीटी) पैसे जमा करून कालापव्यय टाळावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले.



मंत्रालयातून विभागीय आयुक्त, तिथून जिल्हाधिकारी आणि मग तिथून तहसीलदार कार्यालयामार्फत या लाभार्थींना पैसे दिले जातात, त्याने बरेच दिवस लागतात. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी सामाजिक न्याय विभागाच्या १०० दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगाने सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या आढावा बैठकीत हे निर्देश दिले. या लाभार्थींच्या बँक खात्यात लाडकी बहीण योजनेप्रमाणे थेट पैसे आता जातील. विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळण्यासाठी योजनांच्या सध्याच्या अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्यात याव्यात. शासकीय वसतिगृह इमारतींची आवश्यक दुरुस्ती करावी, वसतिगृहांत सोयी वेळेत मिळतील याची खात्री करावी. तसेच त्यांची प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन करावी. जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाइन करावी. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी पोर्टल लवकरात लवकर सुरू करावे, असे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, पंकज भोयर, इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते.

**सौर कृषी वाहिनी कामाला वेग द्या**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी हा महाराष्ट्र शासनाचा फ्लॅगशिप कार्यक्रम आहे. या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून, प्रकल्प विकासकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक यांनी नियमित आढावा बैठक घ्याव्यात. यासंदर्भातील अहवाल येत्या १५ दिवसात मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करावेत.

जलजीवन मिशन योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेत राज्याचा सहभाग अधिक दिसावा यासाठी योजनेची कामे मिशन मोडवर करून ही योजना संपूर्ण सौर ऊर्जेवर आणावी.

# सावध व्हा! बालविवाहास चालना देणाऱ्यांची आता गय नाही

## बालविवाहात सेवा देणाऱ्यांचा वाजणार ‘बँड’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

बालविवाह करणे कायद्याने गुन्हा आहे. असे असतानाही काहीजण बालविवाह करतात. यावर नियंत्रण मिळविण्यासाठी बालविवाहात सेवा देणाऱ्या व्यावसायिकांना मनाई केली जात आहे. एवढेच नव्हे तर, बालविवाहास चालना देणाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे बालविवाहास उपस्थित राहणे किंवा सेवा देणे टाळले पाहिजे. बालविवाह होत असेल तर त्वरित प्रशासनाला माहिती देणे प्रत्येकाची जबाबदारी आहे.



खेळण्या-बागडण्याच्या आणि शिक्षण घेण्याच्या वयात मानसिक व शारीरिकदृष्ट्या कुठलीच तयारी नसताना मुलीचे लग्न झाल्यास तिला पुढील काळात विविध समस्यांचा सामना करावा लागू शकतो. वधू-वर सज्ञान म्हणजेच मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे असेल, तर विवाह ग्राह्य मानले जाते. त्यामुळे या वयानंतरच विविह करावा,

**ग्रामपंचायतींनी काय काळजी घ्यावी?**

स्थानिक ग्रामपंचायतने त्यांचे कार्यक्षेत्र व आसपासच्या गावातील असे व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती व संस्थांची यादी, त्यांचे संपर्क क्रमांक व अनुषंगिक माहिती स्वतंत्र नोंदवहीत नोंदवून जतन करावी. विवाह समारंभाशी संबंधित व्यावसायिकांकडील नोंदवह्या व ग्रामपंचायतकडील नोंदवह्या तपासाव्या व त्यातील माहिती वापरण्याचा अधिकार संबंधित कार्यक्षेत्रातील बालविवाह प्रतिबंधक अधिकारी व ग्रामनगरस्तरीय बालसंरक्षण समितीस असेल.

**या कलमानुसार होणार कारवाई**

बालविवाहास चालना देणाऱ्यांविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अन्वये कलम ९, १० आणि ११ अन्वये व फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३चे कलम १३३ तसेच भारतीय दंड संहिता (बीएनएस) १८६०चे कलम २८८ अन्वये कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाने दिले.

# सावित्रीबाई फुले जयंती निमित्त विद्यापीठात कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ : जाणीवजागृती विषयावर ०३ जानेवारी रोजी कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त दि. ०३ जानेवारी २०२५ रोजी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ : जाणीवजागृती कार्यशाळा या विषयावर दृक- श्राव्य सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे एक दिवसीय कार्यशाळा स. ११.३० ते दु. ०२.०० वाजताच्या दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.



या कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तर उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे उपस्थित असणार आहेत. या कार्यशाळेमध्ये विषयतज्ज्ञ म्हणून कायद्याच्या अभ्यासक सारिका वानखडे या मार्गदर्शन करणार आहे.

ही कार्यशाळा संघटित आणि असंघटित क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्वांसाठी खुली असून पूर्णवेळ उपस्थित राहणाऱ्या सहभागीना इ-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.तरी सदर कार्यशाळेचा लाभ अधिकाधिक व्यक्तींनी घ्यावा असे आवाहन वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक तथा कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. वैशाली गुडधे यांनी केले आहे.

# माजी आमदार प्रदीप नाईक यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १ मुंबई**

किनवटचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाने धडाडीचा लोकप्रतिनिधी, कर्तव्यनिष्ठ लोकसेवक हरपला आहे. त्यांच्या निधनाने किनवटच्या सामाजिक जीवनाशी घट्ट नाळ जुळलेले व्यक्तिमत्त्व हरपले आहे. किनवट विधानसभा मतदारसंघाच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. दिवंगत प्रदीप नाईक यांच्या कुटुंबियांच्या, सहकाऱ्यांच्या, कार्यकर्त्यांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी असून मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो. अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करुन श्रद्धांजली वाहिली.



# वर्षअखेरीस दोन हजार गावांना ‘महसूल’चा शॉक : अंतिम ५५ पैसेवारी; बाधित पिके बेदखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

सरासरीपेक्षा जास्त पावसाने खरीप हंगामातील मूग, उडीद बाद झाले. सोयाबीन, कपाशी, तुरीच्या पिकांची वाढ खुंटली. सरासरी उत्पादकतेमध्ये कमी आलेली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सन २०२४-२५ करिता खरीप पिकांची अंतिम ५५ पैसेवारी ३१ डिसेंबरला जाहीर केली. यामध्ये जिल्ह्यातील १९८६ गावांमध्ये अन्याय झाल्याची भावना आहे. शिवाय खरिपाची बाधित पिके बेदखल करण्यात आल्याचा आरोप होत आहे.



यंदाच्या खरीप हंगामात जून अखेरपासून पावसाने रिपरिप लावली ती ऑक्टोबर महिन्यापर्यंत सुरू होती. या दरम्यान ४६ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. संततधार पावसाने ६० दिवसांचे मूग व उडदाचे पीक बाद झाले. शिवाय शेतात पाणी साचल्याने सोयाबीन, तूर व कपाशीचे पीक पिवळे पडले, पिकांची वाढ खुंटली. पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव झाला.सोयाबीनवर येलो मोझेंक, खोडमाशी, कपाशीवर गुलाबी बोंडअळी, बॉडसड, लाल्या व तुरीवर मर व ढगाळ वातावरणाने शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झालापैसेवारीत तुरीचे पीक रब्बी हंगामात गृहीत धरण्यात येत असले तरी अन्य पिकांची पावसाने वाट लागली व सरासरी उत्पादकतेमध्ये कमी येत आलेली आहे. शिवाय शेतकऱ्यांच्या पदरी हमीभावही पडत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आलेले आहेत. अशा परिस्थितीत पीक स्थितीचे वास्तव प्रशासनाने डावलल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

**आठ प्रकारच्या सवलतींना जिल्हा मुकला**

जिल्ह्यात ५० च्या आत पैसेवारी जाहीर झाली असती तर शेतकऱ्यांना विविध आठ प्रकारच्या सवलतींचा लाभ मिळाला असता. यामध्ये जमीन महसुलात माफी, वीज बिल ❊ वसुली नाही, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क - माफ, रोहयोची कामे सुरू यासह अन्य सवलती शासनाद्वारे देण्यात येतात. आता अंतिम पैसेवारी ५५ जाहीर झाल्याने जिल्हा या सवलतीपासून वंचित राहिला आहे.

# नववर्षात शेतकऱ्यांना शेतमालाच्या दरवाढीची अपेक्षा

## दर घटल्याने शेतकरी चिंतेत : आर्थिक बजेट कोलमडणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

यंदा कापसाचे उत्पादन कमी आहे. त्या तुलनेत खासगी बाजारपेठेत कापसाला अत्यल्प दर मिळत आहे. सोयाबीनने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आणले. सोयाबीनचे दर चार हजार रुपयांच्या खाली आल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले आहे. यंदा पावसामुळे तसेच पुरामुळे शेतीचे नुकसान झाल्याने कापसाचे उत्पादन कमी झाले आहे. कापूस पिकांवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याने कमी दरात कापूस विकणे शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे नववर्षात शेतमालाची दरवाढ व्हावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.



जिल्ह्यात अमरावती, धामणगाव, अचलपूर तालुके कापूस उत्पादनात अग्रेसर आहेत. दरवर्षी अस्मानी सुलतानी संकटांनी शेतकऱ्यांची पाठ सोडली नाही. यंदा निसर्ग कोपल्याने शेतकऱ्यांना पुराचा तडाखा बसला. त्यातून उसनवारी व कर्ज काढून शेतकऱ्यांनी कशीबशी शेती केली. मात्र,

यंदा कापसाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. यंदा कापसाचे उत्पादन कमी आहे. कापूस पिकांवर मोठ्या प्रमाणात शेतकरी खर्च करीत असल्याने कमी दरात कापूस विकणे शेतकऱ्यांना परवडत नाही. सोयाबीनचे दर खासगी बाजारपेठेत चार हजार रुपयांच्या खाली आल्याने त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. आज, उद्या शेतमालाची दरवाढ होईल, या भोळ्याभाबड्या आशेवर शेतकरी आहेत. २०२४ वर्ष संपले तरी अद्यापही शेतमालाची दरवाढ झाली नाही. त्यामुळे शेतमालाची दरवाढ होईल की नाही या विवंचनेत शेतकरी आहेत.

शेतकऱ्यांचे नगदी पीक समजल्या जाणाऱ्या कापसाचे दर वाढले नसल्याने शेतकऱ्यांना नाइलाजाने सात हजार रुपये प्रतिक्विंटल इतक्या कवडीमोल दरात कापूस खासगी बाजारपेठेत विकावा लागत आहे. सोयाबीनचे दर खासगी बाजारपेठेत चार हजार रुपयांच्या खाली आल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. काही शेतकऱ्यांना अडचण सहन करीत नववर्षात तरी शेतमालाची दरवाढ होईल, या आशेवर शेतमाल घरीच भरून ठेवला आहे. त्यामुळे नववर्षात तरी शेतमालाची दरवाढ शासनाने करावी एवढीच माफक इच्छा शेतकऱ्यांना आहे.

**शेतमालाच्या उत्पादनात घट**

कापूस शेतकऱ्यांचे नगदी पीक असल्याने कापसावरच शेतकऱ्यांची भिस्त आहे. मात्र, शेतकऱ्यांना कवडीमोल दरात कापूस विकावा लागत आहे. त्यासोबतच यंदा सोयाबीनचे उत्पादन घटले. मात्र, सोयाबीनची दरवाढ झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा वार्षिक बजेट कोलमडले आहे. निसर्गाची अवकृपा आणि शासनाचे शेतकरी विरोधी धोरण शेतकऱ्यांसाठी घातक ठरत आहे. त्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होत आहेत.

# अबब! आधी केस ओढले, मग जमिनीवर एकमेकींना आपटलं; बस स्टॉपवर महिलांची कुटाकुटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मोर्शी**

सोशल मीडियावर प्रत्येक मिनिटाला विविध व्हिडिओ अपलोड होत असतात. कधी मुंबई लोकलमधील तर कधी बसमध्ये झालेल्या हाणामारीचे. अनेकदा व्हायरल व्हिडिओ चक्क महिलांच्या जोरदार हाणामारीचेही पाहण्यास मिळतात, त्यासंबंधित एक व्हिडिओ पुन्हा एकदा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल होत आहे, ज्या महिला आणि



काही तरुणींची आपआपसात जोरदार हाणामारी पाहण्यास मिळत आहे.व्हायरल होत असलेल्या व्हिडिओत तुम्ही पाहिले तर भररस्त्यावर काही महिला आणि तरुणी एकमेंकीना जोरदार मारत आहे. लाथा-बुक्क्यांनी त्या हाणत आहे मात्र चक्क म्हणजे एकमेंकीचे केस ओढत अन् जमिनीवर पाडत जोरदार मारामारी करत आहेत. एका बाजूला महिला आणि तरुणींची हाणामारी होत आहे तर दुसऱ्या बाजूला रस्त्यावरील संपूर्ण जनता सर्व घडत असलेला प्रकार पाहत आहे तर काहीजण मोबाईलमध्ये कैद करत आहेत.

# ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे पारदर्शक व गुणवत्तापूर्ण करावी : जयकुमार गोरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ मुंबई**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

मंत्रालयात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तसेच कंत्राटी कामगार वेतन थकबाकीबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव सतिश चिखलीकर, वित्तीय नियंत्रक अभय धांडे, उपसचिव प्रशांत पाटील, कार्यासन अधिकारी विवेक शिंदे, अच्युत इप्पर, विजय चौधरी उपस्थित होते.

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकषात बदल करण्यासाठी केंद्र सरकारसोबत चर्चा करण्यात येईल, जेणेकरुन कामात सुलभता निर्माण होईल. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावेत. ग्रामीण तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पुढील कामे मंजूर करण्यासाठी बाह्य वित्तीय संस्थांकडून आर्थिक मदत घेण्याबाबत प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कंत्राटी कामगार वेतन थकबाकीसंदर्भातील आढावाही यावेळी घेण्यात आला.

# महाराष्ट्रात प्रजासत्ताक दिनाची शालेय सुट्टी होणार रद्द, सरकारचा मोठा निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

२६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण देशात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी देशात सर्वत्र शालेय विद्यार्थ्यांना सार्वजनिक सुट्टी दिली जाते. सकाळी शाळेत झेंडा वंदन झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सुट्टी दिली जाते. मात्र येथून पुढे शालेय विद्यार्थ्यांना ही सुट्टी मिळणार नाही. महाराष्ट्र सरकारने प्रजासत्ताक दिनाची सुट्टी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यार्थ्यांना सुट्टी देण्याऐवजी शाळा प्रशासनाने शाळेत देशभक्ती पर कार्यक्रमांचं आयोजन करावं आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करावी, असे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यामुळे यावर्षीपासून महाराष्ट्रात शालेय विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाची सुट्टी मिळणार नाही. याऐवजी त्यांना शाळेतील विविध कार्यक्रमांना आणि स्पर्धांना उपस्थित राहावं लागणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने मंगळवारी एक परिपत्रक जारी करून सर्व सरकारी आणि खाजगी शाळांना प्रजासत्ताक दिनी शाळेत दिवसभर देशभक्ती थीमसह विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. २६ जानेवारीच्या दिवशी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राचा इतिहास, आपली महान संस्कृती आणि देशाचे भविष्य याबद्दल राष्ट्रीय अभिमानाची भावना निर्माण केली पाहिजे. त्यामुळे २६ जानेवारी २०२५ पासून प्रजासत्ताक दिन सर्व माध्यमांच्या सर्व सरकारी आणि खाजगी शाळांमध्ये विविध कार्यक्रमांसह साजरा केला जाईल, असे परिपत्रकात नमूद केलं आहे.

या दिवशी कोणते कार्यक्रम घ्यावेत, यासाठी आठ स्पर्धा आणि कार्यक्रमांची यादी देण्यात आली आहे. त्यामध्ये ध्वजारोहणानंतर प्रभातफेरी, वक्तृत्व स्पर्धा, कविता स्पर्धा, नृत्य, चित्रकला, निबंध आणि क्रीडा स्पर्धा आणि प्रदर्शन यांचा समावेश करण्यात आला आहे. हे सगळे कार्यक्रम देशभक्तीपर थीमवरच असावेत, असं पत्रकात म्हटलं आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षकांना निर्देशाची अंमलबजावणी करावी लागणार आहे.

# १९४७ सारखेच वर्ष २०२५, सरकारी कर्मचाऱ्यांचा मात्र हिरमोड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नागपूर**

सरत्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना साऱ्यांनाच उत्सुकता असते ती नवे वर्ष कसे असेल याची आणि मग सुरू होतो तो दिनदर्शिकांचा शोध. यंदाही अनेकांना तेच वाटतेय, की २०२५ हे वर्ष कसे असेल याची. मात्र, जसा माणसाचा पुनर्जन्म होतो असे म्हणतात ना, तसाच पुनर्जन्म झाला आहे तो १९४७ या वर्षाचा. होय.. १९४७ आणि २०२५ हे वर्ष अगदीच सारखे आहे. अंकगणिततज्ञ आणि तीन हजार वर्षांची दिनदर्शिका तोंडपाठ करण्याचा विक्रम करणारे सुभाष दाभिरकर यांनी ही माहिती दिली आहे. नवीन




वर्ष सुरु होताच नविन दिनदर्शिका हाती घेऊन त्यातील सणवार, वाढदिवस, सार्वजनिक सुट्या असे सारेच शोधायला लागतात. यावर्षीही तेच होणार आणि यात काहीही नाविन्य नाही. मात्र, यावर्षी म्हणजेच २०२५ मध्ये काहीतरी नाविन्य आहे.

२०२५ या वर्षातील तारखा आणि दिवस हे १९४७ च्या दिनदर्शिकेतील बऱ्याच प्रमाणात मिळतेजुळते आहेत. १९४७ आणि २०२५ ची दिनदर्शिका जवळपास एकसारखी आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्यदिन अर्थातच १५ ऑगस्ट ला आला होता, तर यावर्षी सुद्धा १५ ऑगस्टला शुक्रवारच आहे. एवढेच नाही तर १९०२, १९१३, १९१९, १९३०, १९४१, १९५२, १९५८, १९६९, १९७५, १९८६, १९९७, २००८, २००३, २०१४ या वर्षातील तारखा आणि वर जवळपास सारखेच आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांची मात्र यंदा घोर निराशा झाली आहे. नवीन वर्षात चार शासकीय सुट्ट्या रविवारी आल्या आहेत आणि त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या हक्कांच्या सुट्ट्यावर संक्रांत आली आहे. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांचा हिरमोड झाला आहे. प्रजासत्ताक दिन म्हणजेच २६ जानेवारीला रविवार आहे. ३० मार्चला येणारा गुढीपाडवा देखील रविवारीच आला आहे. सहा एप्रिलला असणारी रामनवमी देखील रविवारी याच दिवशी आहे. तर सहा जुलैला येणारा मोहरम हा सणदेखील रविवारी आहे. याशिवाय दोन ऑक्टोबरला दसरा आणि महात्मा गांधी जयंती सुद्धा एकाच दिवशी आहे. त्यामुळे आणखी एका सुटीला सरकारी कर्मचाऱ्यांना मुकावे लागणार आहे. याशिवाय येणाऱ्या वर्षांमध्ये एप्रिल महिन्यात सरकारी कर्मचाऱ्यांना बारा एप्रिलला शनिवार, १३ एप्रिलला रविवार आणि १४ एप्रिलला आंबेडकर जयंती अशा सलग तीन सुट्या आल्या आहेत. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना सहलीचा बेत, सहलीचे नियोजन करण्यात कोणताही अडथळा येणार नाही.

# वयोवृद्ध निराधार योजनेचे लाभार्थी शिवसेनेच्या नेतृत्वात तहसील कार्यालयात धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नांदगाव खंडेश्वर**

शासनाच्या निराधार योजनेचे मागील तीन महिन्यापासून पगार न मिळाल्याने वयोवृद्ध विधवा अपंग यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून लाभार्थ्यांनि ठाकरे गटाच्या शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयात धडक देऊन सात दिवसांत निराधारांचें पगार न झाल्यास



ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिला तालुक्यातील अपंग, विधवा महिला,परितक्ता, वयोवृद्ध लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्याला मिळणारे पगार मागील तीन महिन्यापासून थांबल्याने लाभार्थ्यांना तहसील कार्यालय व बँकेत चकरा माराव्या लागत असल्याने लाभार्थी हैराण झाले आहे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे त्यामुळे लाभार्थ्यांनि शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनि लाभार्थ्यांनसह तहसील कार्यालयात धडक देऊन तहसीलदार यांना निवेदन सादर करून सात दिवसांत पगार वाटप न झाल्यास तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिला यावेळी मोहम्मद नाझीम देवराव मेश्राम अशोक थोरात भीमराव शिरभाते विठोबा देवघरे सुरेश चौरागडे पिरिस पवार यशोदाबाई वाघाडे दुर्गाबाई बनसोड यांचेसह अनेक लाभार्थी उपस्थित होते.

# नवीन वर्षाचा पहिलाच दिवस अन् मुख्यमंत्र्यांचा पहिला दौरा दुर्गम भागात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१गडचिरोली**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नवीन वर्षात पहिल्याच दिवशी नक्षल प्रभावित गडचिरोली जिल्ह्यात गेले. एका शाळेतील मुलांशी त्यांनी संवादही साधला. आपल्याला गडचिरोली जिल्ह्याचा पालकमंत्री व्हायला आवडेल, असे फडणवीस म्हणाले होते. त्याअनुषंगाने नववर्षाच्या पहिल्या दिवशी त्यांनी केलेला गडचिरोली जिल्हा दौरा महत्वाचा ठरतो.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स.११ वा.च्या सुमारास आगमन झाले. तेथे त्यांचे विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी स्वागत केले. तेथून ते हेलिकॉप्टरने गडचिरोलीला गेले. तेथे त्यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्‌घाटन आणि भूमिपूजन झाले. त्यांनी गडचिरोलीमधील शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



अनेकांशी हस्तांदोलन केले. गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त करण्याचा संकल्प त्यांनी या दौऱ्यात व्यक्त केला. गडचिरोलीला स्टील सिटी म्हणून नावारुपास आणणार याचा पुनरुच्चारही केला.

फडणवीस यांच्या दौऱ्यातही एक नक्षलवादी शरण येणार असल्याचे संकेत आहे. नक्षलवाद गडचिरोली जिल्ह्यातील विकासात अडसर ठरला होता. मात्र महायुती सरकारच्या काळात उपमुख्यमंत्री असताना या जिल्ह्यात पोलाद प्रकल्पाची पायाभरणी केली. खनिज संपत्तीवर आधारित उद्योग उभारणीला सुरूवात केल्याने हा जिल्हा पोलाद नगरी म्हणून नावारुपास येण्याची शक्यता आहे. आता फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने त्यांनी या जिल्ह्याच्या विकासासाठी केलेल्या घोषणांना मूर्तरुप येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नवीन वर्षातील हा पहिलाच गडचिरोली दौरा अनेक कारणांनी महत्वाचा ठरला आहे. त्यांच्या या दौऱ्यामुळे पोलीस दल व प्रशासनासोबत या भागातीलत जनतेच्या मनातही आत्मविस्वासाची भावना निर्माण होण्यास मदत होणार आहे.

# धान-भरडधान्य खरेदीसाठी शासकीय पोर्टलवर नोंदणी करण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ मुंबई**

शासकीय खरेदी केंद्रावर धान/भरडधान्य विक्रीसाठी शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्याकरिता ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत होती. मात्र अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने विविध लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार शासनाने नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून धान/ भरडधान्य खरेदी केले जाते. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे.